Exampapers247 सेवा (मुख्य) परीक्षा - २०२० Exampapers247

A → संच क्रमांक

2020

J14

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 303889

प्रश्नपुस्तिका

सामान्य अध्ययन - II

एकूण प्रश्न : 150
एकूण गुण : 150

वेळ : 2 (दोन) तास

सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **150** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.



(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता 25% किंवा 1/4 एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील."**

ताकीद

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेल्ली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवारास परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेल्ली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असल्ली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) भारताच्या राष्ट्रपतीच्या विशिष्ट विवेकाधीन अधिकार क्षेत्राचा स्पष्टपणे उल्लेख नाही जसा राज्यपालाच्या विशिष्ट विवेकाधीन अधिकार क्षेत्राचा आहे.

(2) राज्यपालाने केलेल्या कृतीच्या वैधतेबद्दल त्याने आपल्या विवेकाधीन अधिकारात ते करायला हवे होते किंवा नाही यावरून प्रश्न उपस्थित करता येतो.

(3) 42व्या घटनादुरुस्तीनंतर मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक करण्यात आला आहे पण राज्यपालाबाबत अशी तरतूद नाही.

(4) वरीलपैकी एकही नाही.

Which one of the following statement is **not correct** ?

(1) The President of India has no clearly speltout specific area of discretionary power whereas the Governor has.

(2) The validity of anything done by the Governor can be called in question on the ground that he ought or ought not to have acted in his discretion.

(3) After the 42nd amendment, cabinet advice has been made binding on the President, but no such provision has been made with respect to the Governor.

(4) None of the above.

---

2. उप-राष्ट्रपतीच्या स्थानासंबंधी खालील विधाने विचारात घ्या.

(a) संविधानाचे कलम-63 हे उप-राष्ट्रपती पदासंदर्भात आहे.

(b) तो राज्यसभेचा सदस्य असतो.

(c) त्यास राज्यसभेचा अध्यक्ष म्हणून वेतन दिले जाते.

(d) त्यास महाभियोगाद्वारे पदावरून दूर केले जाऊ शकते.

वरील विधानांपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(1) (a), (b) आणि (d) (2) (a) आणि (c)

(3) (a), (c) आणि (d) (4) वरील सर्व

Consider the following statements regarding the position of the Vice-President.

(a) Article-63 of the Constitution deals with the office of Vice-President.

(b) He is a member of the Rajya Sabha.

(c) He draws a salary as Chairman of Rajya Sabha.

(d) He can removed from the post by impeachment.

Which of the above statements are **correct** ?

(1) (a), (b) and (d) (2) (a) and (c)

(3) (a), (c) and (d) (4) All above

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

3. लोकपाल व लोकायुक्त अधिनियम-2013 च्या प्रमुख वैशिष्ट्याबाबत खालीलपैकी कोणते **चुकीचे** आहे ?
(1) लोकपाल मध्ये अध्यक्ष आणि काही सदस्य असतील व त्यापैकी 50 टक्के न्यायिक सदस्य असतील.
(2) लोकपाल मधील 50 टक्के सदस्य अनुसूचित जाती/जमाती/इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यांक व महिला यामधील असतील.
(3) लोकपाल अध्यक्ष आणि सदस्यांचा कार्यकाळ 5 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत असेल.
(4) पंतप्रधानांचाही लोकपालाच्या अधिकारक्षेत्रात समावेश करण्यांत आला आहे.

Which one of the following statements about the main features of the Lokpal and Lokayukta Act-2013 is **incorrect** ?
(1) Lokpal will consist of a Chairperson and some members of which 50 percent shall be judicial members.
(2) 50 percent of members shall be from SC/ST/OBCs, minorities and women.
(3) The term of office for Lokpal Chairperson and members will be 5 years or till attaining the age of 65 years.
(4) Prime Minister has been brought under the preview of the Lokpal.

4. खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?
(1) अनुच्छेद - 368 खाली राज्यघटनेत दुरुस्ती करण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या एकूण सभासद संख्येच्या दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता असते.
(2) कोणत्याही व्यक्तिस विभागीय खटल्यासह एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा अधिक वेळा आरोपी केले जाणार नाही व एकापेक्षा अधिक वेळा शिक्षा दिली जाणार नाही.
(3) भारताच्या मंत्रिपरिषदेतील पंतप्रधानाव्यतिरिक्त एकूण मंत्र्यांची संख्या लोकसभेतील एकूण सभासदांच्या पंधरा टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही.
(4) वरीलपैकी एकही नाही.

Which one of the following statement is **correct** ?
(1) To amend the Constitution under Article - 368, two thirds majority of the total membership of both the houses of the Parliament is required.
(2) No person shall be prosecuted and punished for the same offence more than once including any departmental proceedings'.
(3) The total number of ministers, excluding the Prime Minister, in the Council of Ministers of India shall not exceed fifteen percent of total membership of the Lok Sabha.
(4) None of the above.

5. केन्द्रीय सेवे संबंधातील अतिरिक्त कार्ये संघ लोकसेवा आयोगाकडे _____ द्वारे सुपुर्त केली जावू शकतात.
(1) केन्द्रीय गृहमंत्री (2) राष्ट्रपती
(3) संसद (4) केन्द्रीय मंत्रिपरिषद

The additional functions relating to the services of the Union can be conferred on UPSC by the _____ .
(1) Union Home Minister (2) President
(3) Parliament (4) Union Council of Minister

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

6. खालील विधाने विचारात घ्या :

(a) संसदेच्या दोन्हीही गृहातील नामनिर्देशित सदस्यांना राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीत मतदानाचा अधिकार नसला तरी त्यांना उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीत मतदानाचा अधिकार असतो.

(b) लोकसभेतील नामनिर्देशित सदस्यांना राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीत मतदानाचा अधिकार नसला तरी त्यांना राष्ट्रपती विरुद्धच्या महाभियोगाच्या ठरावामध्ये मतदानाचा अधिकार असतो.

पर्यायी उत्तरे :

(1) विधान (a) बरोबर आहे. (2) विधान (b) बरोबर आहे.

(3) दोन्हीही विधाने बरोबर आहेत. (4) दोन्हीही विधाने चुकीची आहेत.

Consider the following statements.

(a) While the nominated members of the two Houses of the Parliament have no voting right in the Presidential election, they have the right to vote in the election of the Vice-President.

(b) While the nominated members of the Lok Sabha have no voting right in the Presidential election, they have the right to vote in the impeachment motion against the President.

Answer Options :

(1) Statement (a) is correct. (2) Statement (b) is correct.

(3) Both the statements are correct. (4) Both the statements are false.

---

7. भारतात माहितीचा अधिकार आवश्यक आहे कारण :

(a) त्यामुळे प्रशासन आणि जनतेमधील दुरावा कमी होतो.

(b) त्यामुळे प्रशासन अधिक नवकल्पना अंगीकारते.

(c) त्यामुळे प्रशासन लोक प्रतिनिधींना अधिक उत्तरदायी बनते.

(d) त्यामुळे प्रशासन जनतेच्या गरजेपोटी अधिक प्रतिक्रियाशील बनेल.

(e) त्यामुळे लोकांना प्रशासकीय निर्णय प्रक्रियेसंबंधी माहिती होते.

यापैकी कोणती विधाने **बिनचूक** आहेत ?

(1) (a), (b) आणि (e) (2) (c), (d) आणि (e)

(3) (a), (d) आणि (e) (4) वरील सर्व

Right to information is necessary in India because :

(a) It reduces the gap between administration and people.

(b) It makes administration more innovative.

(c) It makes administration more accountable to people's representatives.

(d) It makes administration more responsive to the requirements of people.

(e) It makes people aware of administrative decision making.

Which of these are **correct** statements ?

(1) (a), (b) and (e) (2) (c), (d) and (e)

(3) (a), (d) and (e) (4) All above

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

8. **अयोग्य** कथन ओळखा :

(1) भारताच्या निवडणूक आयोगाने 2000 साली त्यांचा सुवर्ण महोत्सव साजरा केला.

(2) भारताचा निवडणूक आयोग ही स्थायी संवैधानिक संस्था आहे.

(3) भारताच्या निवडणूक आयोगाने मतदार शिक्षण आणि निवडणुकीतील सहभाग हा निवडणूक व्यवस्थापनाचा अविभाज्य भाग म्हणून 2009 मध्ये औपचारिकरित्या स्वीकारला.

(4) सुनिल अरोरा हे भारताचे 23वे मुख्य निवडणूक आयुक्त होते.

Select the **incorrect** statement.

(1) The Election Commission of India celebrated its Golden Jubilee in the year 2000.

(2) Election Commission of India is a permanent constitutional body.

(3) Election Commission of India, in 2009, formally adopted voter education and electoral participation as an integral part of its election management.

(4) Sunil Arora was the 23rd Chief Election Commissioner of India.

---

9. भारतीय राज्यघटनेतील संदर्भानुसार 'धर्मनिरपेक्ष राज्य' म्हणजे :

(1) राज्य हे धार्मिकतेच्या विरुद्ध आहे

(2) राज्याला धर्म आहे

(3) राज्य हे अधार्मिक आहे

(4) राज्याने कोणत्याही विशिष्ट धर्माला अग्रक्रमाने वागणूक देण्याचे टाळले आहे.

The term 'Secular State' in the context of Indian Constitution refers to :

(1) The state is anti-religious

(2) The state has a religion

(3) The state is irreligious

(4) The state avoids preferential treatment for any particular religion

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

10. कोणत्या घटना दुरुस्ती/दुरुस्त्या मूलभूत कर्तव्याशी संबंधित आहे/आहेत ?

(a) 42वी घटना दुरुस्ती (b) 46वी घटना दुरुस्ती

(c) 86वी घटना दुरुस्ती (d) 88वी घटना दुरुस्ती

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त (a) (2) फक्त (d) (3) फक्त (b), (d) (4) फक्त (a), (c)

Which Constitutional Amendment/s is/are related to Fundamental Duties ?

(a) 42nd Constitutional Amendment (b) 46th Constitutional Amendment

(c) 86th Constitutional Amendment (d) 88th Constitutional Amendment

Answer Options :

(1) only (a) (2) only (d) (3) only (b), (d) (4) only (a), (c)

---

11. खालील विधाने लक्षात घ्या :

(a) कलम 12 मध्ये घटनेच्या तिसऱ्या भागात राज्याची व्याख्या करण्यात आली आहे.

(b) सर्व स्थानिक प्राधिकरणे, म्हणजेच नगरपालिका, पंचायत, जिल्हा मंडळे, इंप्रुव्हमेंट ट्रस्टस् (विश्वस्त) इ. चा राज्याच्या व्याख्येत समावेश होतो.

(c) इतर सर्व प्राधिकरणे म्हणजेच एलआयसी, ओएनजीसी, सेल यांचा ही राज्याच्या व्याख्येत समावेश होतो.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने **अचूक** आहेत ?

(1) फक्त (a) (2) फक्त (a) आणि (b) (3) फक्त (b) (4) सर्व

Consider the following statements :

(a) Article 12 has defined the term state in the Part III.

(b) All the local authorities, that is, municipalities, Panchayats, district boards, improvement trusts etc. are included in this definition of state.

(c) Authorities like LIC, ONGC, SAIL are included in this definition of State.

Which of the above statements is/are **correct** ?

(1) only (a) (2) only (a) and (b) (3) only (b) (4) all

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

12. खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) 'न्यायालयीन सक्रियता' हा शब्दप्रयोग सर्वप्रथम 1947 साली ऑर्थर श्लेसिंजर (ज्यु.) यांनी वापरला.

(2) कार्यकारी विभाग आणि विधिमंडळ कृती करण्यात अपयशी ठरल्यामुळे प्रामुख्याने न्यायालयीन सक्रियतेचा उदय झाला.

(3) न्यायालयीन सक्रियतेमुळे कायदेमंडळाच्या अधिकारात वाढ झाली.

(4) न्यायालयीन सक्रियतेमुळे सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारात आणि प्रतिष्ठेत वाढ झाली.

Which one of the following statement is **incorrect** ?

(1) The term 'Judicial Activism' was coined for the first time by Arthur Schlesinger Jr. in 1947.

(2) Judicial activism has arisen mainly due to the failure of the executive and legislature to act.

(3) Judicial activism led to increase in the powers of the legislature.

(4) Judicial activism has enhanced the powers and prestige of the Supreme Court.

---

13. खालील विधाने विचारात घ्या :

(a) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाला न्यायालयासमोर विचाराधीन असणाऱ्या एखाद्या प्रकरणात मानवी हक्क उल्लंघनाचा प्रश्न गुंतला असल्यास त्या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.

(b) राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग व राष्ट्रीय महिला आयोग यांचे अध्यक्ष हे राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतात.

वरीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) दोन्ही (4) दोन्हीपैकी कोणतेही नाही

Consider the following statements :

(a) The National Human Rights Commission cannot intervene in any proceeding involving allegation of Violation of human rights pending before a court.

(b) The Chairman of the National Commission for Minorities, the National Commission for SC's, the National Commission for ST's and the National Commission for Women are the Ex-officio members of the National Human Rights Commission.

Which of the above statement is **incorrect** ?

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither (a) nor (b)

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

14. **यादी - I** आणि **यादी - II** यांची खाली दिलेल्या संकेतांनुसार जोडी जुळवून बिनचूक उत्तर निवडा :

	यादी - I (राज्यघटनेतील परिशिष्टे)		**यादी - II** (तरतूद)
(a)	आठवे परिशिष्ट	(i)	राज्यसभेसाठी प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाला वाटप केलेल्या जागांबाबत
(b)	पाचवे परिशिष्ट	(ii)	राज्यघटनेने मान्यता दिलेल्या भाषा
(c)	सातवे परिशिष्ट	(iii)	शपथ अथवा सत्य विधानाबाबत
(d)	चौथे परिशिष्ट	(iv)	केंद्र आणि राज्यांमध्ये अधिकारांचे वाटप
		(v)	अनुसूचित क्षेत्रे आणि अनुसूचित जमातींचे प्रशासन आणि नियंत्रण

पर्यायी उत्तरे :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(iii)	(v)	(iv)	(i)
(2)	(iii)	(iv)	(v)	(i)
(3)	(ii)	(v)	(iv)	(i)
(4)	(ii)	(iii)	(i)	(iv)

Match **List - I** with **List - II** and select the correct answer by using the codes given below :

	List - I (Schedules of the Constitution)		**List - II** (Provisions)
(a)	Eighth Schedule	(i)	Allocation of seats in the Rajya Sabha to the states and the Union territories
(b)	Fifth Schedule	(ii)	Languages recognised by the Constitution
(c)	Seventh Schedule	(iii)	Forms of oaths or affirmation
(d)	Fourth Schedule	(iv)	Division of powers between the union and the states
		(v)	Provisions relating to the administration and control of scheduled areas and scheduled tribes

Answer Options :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(iii)	(v)	(iv)	(i)
(2)	(iii)	(iv)	(v)	(i)
(3)	(ii)	(v)	(iv)	(i)
(4)	(ii)	(iii)	(i)	(iv)

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

15. 102 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाबाबत खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) मुळत: राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची (NCBC) स्थापना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग अधिनियम 1991 अन्वये झालेली आहे.

(2) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगास 102 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे घटनात्मक दर्जा प्रदान करण्यात आला.

(3) 102 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे राज्यघटनेत अनुच्छेद - 338 B आणि 342 A यांचा समावेश करण्यांत आला.

(4) 102 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे अनुच्छेद - 338 आणि 366 मध्ये बदल करण्यांत आला.

Which one of the following statements about 102nd Amendment Act is **incorrect** ?

(1) The National Commission for Backward Classes (NCBC) was originally set up under the NCBC Act of 1991.

(2) 102nd amendment act granted Constitutional status to the NCBC.

(3) 102nd amendment act inserted Article - 338 B and 342 A into the Constitution.

(4) 102nd amendment act amended Article - 338 and 366.

---

16. 'जनहित याचिके' संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(a) ती कायद्याने घालून दिलेल्या पद्धतीवर आधारित आहे.

(b) ती न्यायसंस्थेला जनतेप्रती असलेली घटनात्मक कर्तव्ये पार पाडण्यास भाग पाडते.

(c) भारतात, भारतीय राज्य घटनेने नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांमध्ये जनहित याचिकेचे स्त्रोत आहेत.

(d) कोणत्याही भारतीय अधिनियमात अथवा कोणत्याही कायद्यात जनहित याचिकेची व्याख्या केलेली नाही.

वरीलपैकी कोणती विधाने **बिनचूक** आहेत ?

(1) (a), (b) आणि (c) (2) (b), (c) आणि (d) (3) (a), (c) आणि (d) (4) वरील सर्व

With reference to the 'Public Interest Litigation (PIL)', consider the following statements :

(a) It is based on procedure established by Law.

(b) It has forced the judiciary to discharge their constitutional obligations towards the people.

(c) In India the source of PIL is fundamental rights provided to citizens by the constitution of India.

(d) PIL is not defined in any Indian statute or in any act.

Which of the statements given above are **correct** ?

(1) (a), (b) and (c) (2) (b), (c) and (d) (3) (a), (c) and (d) (4) All above

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

17. राज्यघटनेच्या अनुच्छेद - 368 संबंधी खालील विधाने विचारात घ्या :

(a) राष्ट्रपतीच्या पूर्व परवानगीने घटनादुरुस्ती विधेयक मंत्री किंवा संसदेचा कोणताही सभासद मांडू शकतो.

(b) घटनादुरुस्ती विधेयकास मंजूरी देण्याबाबत संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये कोंडी निर्माण झाल्यास संयुक्त बैठक घेण्याची तरतूद आहे.

(c) अनुच्छेद - 368 अन्वये मंजूर झालेल्या घटनादुरुस्ती विधेयकास मान्यता देण्याचे बंधन राष्ट्रपतीवर नसते.

(d) राज्यघटनेच्या सातव्या परिशिष्टामध्ये बदल करण्यासाठी निम्म्या राज्य विधिमंडळांची मान्यता आवश्यक असते.

यापैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) (b) आणि (c) (3) फक्त (d) (4) यापैकी एकही नाही

Consider the following statements related to Article - 368 of the Constitution :

(a) The Constitutional amendment bill can be introduced by a minister or by any member of Parliament with the prior permission of the President.

(b) There is a provision for holding a joint sitting of both the Houses of Parliament if there is a deadlock over the passage of a constitutional amendment bill.

(c) It is not obligatory for the President to give his assent to a constitutional amendment bill passed under Article - 368.

(d) To amend Seventh Schedule of the constitution, ratification of half of the state legislature's is essential.

Which of these statements is/are **correct** ?

(1) (a) Only (2) (b) and (c) (3) (d) Only (4) None of these

---

18. केंद्र आणि राज्यांमधील संबंधांबाबतच्या तरतुदी भारतीय राज्यघटनेच्या _____ भागात नोंदविलेल्या आहेत.

(1) 13 व्या (2) 11 व्या (3) 10 व्या (4) 12 व्या

Provisions regarding relations between the Union and the States are mentioned in _____ part of the Indian Constitution.

(1) 13^{th} (2) 11^{th} (3) 10^{th} (4) 12^{th}

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

19. भारत सरकार कायदा - 1935 बाबत खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) या कायद्यान्वये केन्द्रात दुहेरी शासनव्यवस्था लागू करण्यांत आली.

(2) या कायद्यान्वये भारतामध्ये केन्द्रात प्रथमच द्विगृही कायदेमंडळाची निर्मिती करण्यांत आली.

(3) या कायद्यान्वये प्रांतामधील दुहेरी शासन व्यवस्था रद्द केली गेली.

(4) या कायद्यान्वये तीन स्वतंत्र सूच्यांच्या माध्यमातून केन्द्र आणि राज्यांत अधिकारांचे विभाजन करण्यांत आले.

Which one of the following statement/s is **incorrect** about the Government of India Act - 1935 ?

(1) It provided for the adoption of Dyarchy at the centre.

(2) It introduced at the centre for the first time, bicameralism in India.

(3) It abolished Dyarchy in the provinces.

(4) It divided the powers between the centre and the units in terms of three lists.

---

20. भारतीय संविधानाच्या खालील कलमानुसार भाषिक अल्पसंख्यांक समाजातील मुलांना मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण मिळण्याच्या सोयी राज्यशासनाने कराव्यात अशी तरतूद केली गेली :

(a) कलम 265 (b) कलम 251 (c) कलम 350A (d) कलम 121

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (c) (3) केवळ (b) (4) केवळ (d)

Under the following article of the Constitution of India, Provision has been made for the State Government to provide Primary Education in the mother tongue to the children of the linguistic minority community.

(a) Article 265 (b) Article 251 (c) Article 350A (d) Article 121

Answer Options :

(1) Only (a) (2) Only (c) (3) Only (b) (4) Only (d)

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

21. सध्या, राज्याचे राज्यपाल खालीलपैकी कोणते अधिकार वापरतात ?

(a) ते विधान परिषदेवर एक-बारांश सभासद नामनिर्देशित करु शकतात.

(b) ते अँग्लो-इंडियन जमातीचा एक प्रतिनिधी विधान सभेवर नामनिर्देशित करु शकतात.

(c) ते राज्याच्या अथवा केंद्राच्या कायद्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधी व्यक्तिला शिक्षेमध्ये सूट, सवलत किंवा माफी देवू शकतात.

(d) ते अर्थविधेयक राज्य विधीमंडळाच्या विचारार्थ परत पाठवू शकतात.

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (b) (2) (a), (b) आणि (d)

(3) (b) आणि (c) (4) वरीलपैकी एकही नाही

At present, which of the following 'powers' are enjoyed by the Governor of a State ?

(a) He can nominate one-twelfth members of the Legislative Council.

(b) He can nominate one member of the Anglo-Indian community to the Legislative Assembly.

(c) He can grant pardon, reprives, respites and remission of punishment of any person convicted of any offence against central law or state law.

(d) He can return a money bill for the reconsideration of the State Legislature.

Answer Options :

(1) (a) and (b) (2) (a), (b) and (d)

(3) (b) and (c) (4) None of the above

---

22. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाबाबत खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) सुरुवातीला राज्यघटनेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी अनुच्छेद - 338 नुसार विशेष अधिकारी नेमण्याची तरतूद होती.

(2) 1990 च्या 65 व्या घटनादुरुस्तीनुसार एक सदस्यीय पद्धतीचे रूपान्तर बहुसदस्यीय अशा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोगामध्ये करण्यांत आले.

(3) 2003 च्या 89 व्या घटनादुरुस्तीद्वारे अगोदरच्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगाचे भाग पाडून राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग आणि राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग असे दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्यांत आले.

(4) राज्यघटनेच्या अनुच्छेद - 338 अन्वये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी लोकसभेमध्ये आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये राखीव जागा देण्यात आलेल्या आहेत.

Which one of the following statements about National Commission for scheduled castes is **incorrect** ?

(1) Initially, the Constitution provided for the appointment of special officer under Article - 338 for SCs and STs.

(2) 65th Amendment of 1990 replaced the one member system with a multimember National Commission for Scheduled Castes and Scheduled Tribes.

(3) 89th Amendment of 2003 Bifurcated the erstwhile combined National Commission for SCs and STs into two separate Commissions, namely NCSC and NCST.

(4) Article - 338 of the Constitution provide for reservation of seats in favour of SCs and STs in the House of people and in the Legislative Assemblies of the States.

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

23. "भारताचे संविधान हे पूर्णपणे संघराज्यात्मक स्वरूपाचे किंवा पूर्णपणे एककेन्द्री स्वरूपाचे नाही तर त्यामध्ये दोन्ही पद्धतीचे मिश्रण दिसून येईल. दोन्ही पद्धतीच्या मिश्रणातून तयार झालेला तो एक वेगळाच प्रकार होय." असे भारतीय संघराज्याबाबत कोणी म्हटले ?

(1) डॉ. बी.आर. आंबेडकर (2) डॉ. के.सी. व्हीयर

(3) श्री दुर्गादास बसू (4) सरदार पटेल

"The Constitution of India is neither purely Federal not Unitary but is a combination of both. It is a Union or a composite of novel type." Who said this about Indian Federation ?

(1) Dr. B.R. Ambedkar (2) Dr. K.C. Whear

(3) Shri Durgadas Basu (4) Sardar Patel

---

24. महाराष्ट्रातील लोकायुक्त बाबत खालीलपैकी काय खरे **नाही** ?

(1) 2 ऑक्टोबर 1972 रोजी महाराष्ट्र लोकायुक्त संस्था निर्माण करण्यात आली.

(2) महाराष्ट्राचे प्रथम लोकायुक्त न्यायमुर्ती एस.पी. कोतवाल होते.

(3) लोकायुक्त ही स्वतंत्र वैधानिक संस्था आहे.

(4) महाराष्ट्र लोकायुक्त आणि उप-लोकायुक्त अधिनियम 1971 मध्ये लोकायुक्त आणि उप-लोकायुक्त यांचे अधिकार, कार्य व अधिकार क्षेत्र नमूद करण्यात आले आहे.

Which among the following is **not** true about Lokayukta in Maharashtra ?

(1) The Maharashtra Lokayukta Institution came into being from 2nd October 1972.

(2) The first Lokayukta of Maharashtra was Justice S.P. Kotwal.

(3) The Lokayukta is an independent statutory institution.

(4) The functions, powers and jurisdiction of Lokayukta and Upa-Lokayuktas are laid down in the Maharashtra Lokayukta and Upa-Lokayuktas Act, 1971.

---

25. संसदेच्या विभागांशी संबंधित स्थायी समितींचे **अयोग्य** पुनर्नाव ओळखा.

(1) 'पेट्रोलियम आणि रसायने समितीचे' पुनर्नाव 'पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू समिती' असे आहे.

(2) 'श्रमिक समिती' चे पुनर्नाव 'श्रमिक आणि कल्याण समिती' असे आहे.

(3) 'दळणवळण आणि पर्यटन समिती' चे पुनर्नाव 'दळणवळण, पर्यटन व संस्कृती समिती' असे आहे.

(4) 'नागरी आणि ग्रामीण विकास समिती'चे पुनर्नाव 'ग्रामीण विकास समिती' असे आहे.

Select the **incorrect** rename of Departmentally related Standing Committees of Parliament.

(1) Committee on 'Petroleum and Chemicals' is renamed as committee on 'Petroleum and Natural gas'.

(2) Committee on 'Labour' is renamed as committee on 'Labour and Welfare'.

(3) Committee on 'Transport and Tourism' is renamed as committee on 'Transport, Tourism and Culture'.

(4) Committee on 'Urban and Rural Development' is renamed as committee on 'Rural Development'.

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

26. मंत्रिपरिषद (Council of Ministers) आणि कॅबिनेट (Cabinet) यांच्यातील फरकाबाबत खालील विधाने विचारात घ्या.

(a) संपूर्ण राज्यघटनेमध्ये 'मंत्रिपरिषद' हाच शब्दप्रयोग वापरण्यांत आलेला आहे, केवळ अनुच्छेद-352 मध्ये 'कॅबिनेट' हा शब्द वापरलेला आहे.

(b) राज्यघटनेने संपूर्ण सत्ता ही 'कॅबिनेट' कडे सुपुर्त केलेली आहे, परंतु प्रत्यक्षात ही सत्ता मंत्रिपरिषदेद्वारा वापरली जाते.

(c) मंत्रिपरिषदेत कॅबिनेट मंत्री, राज्य मंत्री, उपमंत्री यांचा समावेश असतो तर दुसऱ्या बाजुस कॅबिनेट मध्ये केवळ कॅबिनेट दर्जाचे मंत्री असतात.

वरीलपैकी कोणते विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (c) (3) (a), (b) आणि (c) (4) फक्त (a) आणि (c)

Consider the following statements about the difference between Council of Ministers and Cabinet.

(a) Throughout the constitution the term 'Council of Ministers' has been used, only in Article 352 the term 'Cabinet' has been used.

(b) The constitution vests all the powers in the Cabinet but actually these powers are exercised by the Council of Ministers.

(c) The Council of Ministers shall comprises of three types of Ministers viz. Cabinet Ministers, State and Deputy Ministers. The Cabinet on the other hand consists of only Cabinet Ministers.

Which of the statements given above is/are **correct** ?

(1) (a) only (2) (c) only (3) (a), (b) and (c) (4) (a) and (c) only

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

27. जोड्या लावा - (राज्य नीतीची मार्गदर्शक तत्वे)

	'A'		'B'
(a)	राष्ट्रीय स्मारकांचे संरक्षण	(i)	अनुच्छेद 47
(b)	राहणीमानामध्ये सुधारणा करणे	(ii)	अनुच्छेद 49
(c)	एस्सी/एसटी च्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधाना संरक्षण देणे	(iii)	अनुच्छेद 48
(d)	गोहत्या प्रतिबंध	(iv)	अनुच्छेद 46

पर्यायी उत्तरे :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(i)	(ii)	(iv)	(iii)
(2)	(ii)	(i)	(iii)	(iv)
(3)	(iii)	(ii)	(iv)	(i)
(4)	(ii)	(i)	(iv)	(iii)

Match the pairs - (Directive Principles of State Policy)

	'A'		'B'
(a)	Protection of National Monuments	(i)	Article 47
(b)	To raise the standard of living	(ii)	Article 49
(c)	To protect educational and economic interests of SC/ST	(iii)	Article 48
(d)	Prohibition of Cow-slaughter	(iv)	Article 46

Answer Options :

	(a)	**(b)**	**(c)**	**(d)**
(1)	(i)	(ii)	(iv)	(iii)
(2)	(ii)	(i)	(iii)	(iv)
(3)	(iii)	(ii)	(iv)	(i)
(4)	(ii)	(i)	(iv)	(iii)

303889

28. संसदीय विशेषाधिकाराबाबत खालील विधाने विचारात घ्या :

(a) संसदीय विशेषाधिकार म्हणजे संसदेच्या दोन्ही गृहांना असलेले विशेष हक्क, संरक्षण आणि सवलती होय.

(b) राज्यघटनेने भारताच्या राष्ट्रपतीला देखील संसदीय विशेषाधिकार लागू केलेले आहेत कारण ते देखील संसदेचा एकात्मिक भाग आहेत.

(c) संसदेचे अधिवेशन चालू असतांना किंवा सुरु होण्यापूर्वी 60 दिवस किंवा अधिवेशन संपल्यानंतर 60 दिवस या कालावधीत संसद सदस्याला अटक करता येत नाही.

(d) सभागृहाच्या प्रमुखाच्या परवानगीशिवाय सभागृहाच्या आवारात कोणत्याही व्यक्तिला अटक करता येत नाही अथवा दिवाणी व फौजदारी कायदेशीर प्रक्रिया लागू करता येत नाही.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) (b), (c) आणि (d) (3) (a) आणि (d) (4) (a), (b) आणि (c)

Consider the following statements regarding Parliamentary Privileges :

(a) Parliamentary Privileges are special rights, immunities and exemption enjoyed by two Houses of Parliament.

(b) The Constitution has also extended the Parliamentary Privileges to the President of India because he is also an integral part of the Parliament.

(c) Members of Parliament cannot be arrested during the session and 60 days before the beginning and 60 day after the end of a session.

(d) No person can be arrested, and no legal process [Civil or Criminal] can be served within the precincts of the House without the permission of the Presiding Officer.

Which of the above statement/s is/are **correct** ?

(1) (a) only (2) (b), (c) and (d) (3) (a) and (d) (4) (a), (b) and (c)

---

29. भारतीय राज्यघटनेच्या कलम - 370 बाबत खालील विधाने विचारात घ्या :

(a) कलम - 370 हे भारतीय राज्यघटनेच्या XIX व्या भागात समाविष्ट केले गेले.

(b) जम्मू आणि काश्मिरला विशेष दर्जा प्रदान करण्यासाठी तात्पुरती तरतूद म्हणून त्याचा समावेश करण्यांत आला.

(c) त्या कलमाने जम्मू आणि काश्मिर राज्याच्या संदर्भात संसदेच्या वैधानिक अधिकारांवर बंधने घातली होती.

(d) राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने निर्गमित अध्यक्षीय आदेशामुळे 370 वे कलम हे राज्यघटनेतून पूर्णपणे वगळण्यांत आले आहे.

वरीलपैकी कोणती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) केवळ (a) (2) (b) आणि (c)

(3) (a), (b) आणि (d) (4) वरील सर्व

Consider the following statements about Article-370 of the Indian Constitution :

(a) Article-370 was incorporated in part XIX of the Constitution.

(b) It was included as a temporary provision that grants special status to J & K.

(c) It restricted the Parliament's legislative powers with respect to the state of Jammu and Kashmir.

(d) The Presidential order signed by the President has totally deleted the Article-370 from the Constitution.

Which of the statements above is/are **correct** ?

(1) Only (a) (2) (b) and (c)

(3) (a), (b) and (d) (4) all above

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

30. खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) भारत आणि अमेरिका या दोन्ही संघराज्यातील राज्यघटनेमध्ये अधिकाराच्या तीन याद्या ही बाब समान आहे.

(2) कॅनडाच्या संघराज्याच्या प्रतिकृतीने वैधानिक अधिकाराच्या दोन याद्यांची तरतूद केलेली असून एक यादी ही संघ सरकारची तर दुसरी यादी घटक राज्यांची आहे.

(3) भारतीय संघराज्याची व्यवस्था ही केन्द्र आणि राज्ये यांच्यातील सत्ता विभाजनावर आधारित आहे परंतु त्यांच्यात न्यायालयीन अधिकारांची विभागणी केलेली नाही.

(4) कार्यकारी मंडळ आणि विधीमंडळ यांच्यातील संबंधावर आधारित एखाद्या शासनाचे संघराज्य की एकात्म असे वर्गीकरण केले जाते.

Which one of the following statement is **correct** ?

(1) Three lists of powers in the constitution is a common to both Indian and American Federation.

(2) The Canadian Federal model provides two lists of legislative powers, one for the centre, the other for the provinces and the residuary powers are vested in the provinces.

(3) Indian Federal System is based on division of power between the Union and the States but the judicial power has not been divided between them.

(4) A government is classified as Federal or Unitary on the basis of relations between the executive and the legislature.

---

31. 103 व्या घटनादुरुस्तीबाबत खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) त्याद्वारे समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांसाठी 10% आरक्षण लागू करण्यांत आले.

(2) त्याद्वारे आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा या तत्वावार आधारित आरक्षण देण्यासाठी अनुच्छेद 15 आणि 16 मध्ये बदल करण्यांत आला.

(3) त्याद्वारे शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्था आणि खाजगी शैक्षणिक संस्था आणि अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक संस्थांसह प्रवेश देण्यासाठी आरक्षण देण्यांत आले.

(4) वरीलपैकी एकही नाही.

Which one of the following statements about 103rd Constitutional Amendment Act is **incorrect** ?

(1) It introduces 10% reservation for Economically weaker sections of society.

(2) It amended Article - 15 and 16 to provide for reservation based on economic backwardness.

(3) It provides reservation for admission to government run educational institutions and private educational institutions including the minority educational institutions.

(4) None of the above.

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

32. भारताच्या संविधानामध्ये संयुक्त राज्य अमेरिकेच्या संविधानातून कोणती तत्वे घेण्यात आली आहेत ?

(a) संघ-राज्य संबंधाबाबतीतील तरतुदी

(b) सातव्या परिशिष्टातील समवर्ती सूची

(c) मूलभूत अधिकार

(d) सशस्त्र दलाचे सरसेनापती

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त (a), (c), (d) (2) फक्त (a), (b)

(3) फक्त (b), (c) (4) फक्त (c), (d)

Which principles are borrowed from constitution of United States in Constitution of India ?

(a) Provisions related to Union-State relations

(b) Concurrent List in the seventh schedule.

(c) Fundamental Rights.

(d) Supreme Commander of the Armed Forces.

Answer Options :

(1) Only (a), (c), (d) (2) Only (a), (b)

(3) Only (b), (c) (4) Only (c), (d)

---

33. राष्ट्रीय महिला आयोगाबाबत खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) ती वैधानिक संस्था असून तिच्यात एक अध्यक्ष आणि इतर पाच सदस्य असतात.

(2) अध्यक्षाची नेमणूक भारताचे पंतप्रधान करतात.

(3) ते आपले पद पाच वर्षे किंवा वयाची 70 वर्षे पूर्ण होईपर्यंत धारण करतात.

(4) गुन्हेगारास शिक्षा करण्याचा अधिकार आयोगास आहे.

Which of the following statements regarding National Women's Commission is **correct** ?

(1) It is a statutory Body includes one President and other five members.

(2) President is appointed by Prime Minister of India.

(3) They hold office for a term of 5 years or until they attain the age of 70 years.

(4) Commission has right to punish the criminals.

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

34. राज्यघटनेतील कलम 21 संदर्भात खालीलपैकी कोणते विधान/विधाने **बिनचूक** आहेत ?

(a) कलम 21 नुसार, कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धती खेरीज कोणत्याही व्यक्तीचे जीवित व व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही.

(b) हा अधिकार नागरिक व परदेशीय नागरिक दोहोंनाही उपलब्ध आहे.

(c) कलम 21 नुसार मिळणारे हे संरक्षण केवळ कार्यकारी मंडळाच्या मनमानी कृतीविरोधात असून कायदेमंडळाच्या मनमानी कृतीविरोधात उपलब्ध होत नाही.

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (b) (2) (a) आणि (c) (3) फक्त (a) (4) सर्व

Which of the following statements is/are **correct** about the Article 21 of the Constitution of India ?

(a) Article 21 declares that no person shall be deprived of his life or personal liberty except according to procedure established by law.

(b) This right is available to both citizen and non-citizens.

(c) The protection under Article 21 is available only against arbitrary executive action and not against arbitrary legislative action.

Answer Options :

(1) (a) and (b) (2) (a) and (c) (3) only (a) (4) all

---

35. भारतातील 'अंदाज समिती' बाबत खालील विधाने विचारात घ्या :

(a) भारतातील 'अंदाज समिती' ही ब्रिटीश नमुन्यावर आधारित आहे आणि ती 1952 साली तत्कालीन सभापती जी.व्ही. मावळणकर यांच्या शिफारशीनुसार स्थापन करण्यांत आली.

(b) अंदाज समितीमध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहातील 30 सदस्य असतात.

(c) तिच्या अध्यक्षाची निवड ही समिती सदस्यांकडून होते.

(d) प्रशासनात कार्यक्षमता आणि काटकसर घडवून आणण्यासाठी पर्यायी धोरण सुचविणे हे अंदाज समितीचे कार्य आहे.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/ने **बिनचूक** आहे/त ?

(1) केवळ (a) (2) (a) आणि (b) (3) (a), (c) आणि (d) (4) केवळ (d)

Consider the following statements about 'Estimate Committee' in India :

(a) The Estimate Committee in India has been modelled on the British pattern and was created in 1952 on the suggestion of G.V. Mavalankar, the then speaker.

(b) The Estimate Committee consists of 30 members from the both Houses of Parliament.

(c) It's Chairman is elected by the members of the committee.

(d) The function of Estimate committee is to suggest alternative policies in order to bring about efficiency and economy in administration.

Which of the statements above is/are **correct** ?

(1) (a) only (2) (a) and (b) (3) (a), (c) and (d) (4) (d) only

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

36. इंदिरा गांधी राष्ट्रीय आदिवासी विद्यापीठ अमरकंटक, केंव्हा कार्यरत झाले ?

(1) जुलै - 2007 (2) जून - 2006 (3) जून - 2008 (4) जुलै - 2008

When Indira Gandhi National Tribal University Amarkantak, came into action ?

(1) July - 2007 (2) June - 2006 (3) June - 2008 (4) July - 2008

---

37. **योग्य** कथन/ने ओळखा :

(a) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 19(2) मध्ये असे म्हटले आहे की, भारतीय नागरिकांना भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे.

(b) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारावर काही मर्यादा आहेत, जसे, सार्वजनिक सुव्यवस्था किंवा नैतिकतेचे उल्लंघन करु नये.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त (a) (2) फक्त (b)

(3) (a) आणि (b) दोन्हीही (4) यापैकी नाही

Select the **correct** statement/s :

(a) Article 19(2) of Constitution of India says that citizen of India have the right to freedom of speech and expression.

(b) Right to freedom of speech and expression has some limitation like not to affect/violate public order or morality.

Answer Options :

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Both (a) and (b) (4) None of the above

---

38. 'सर्व शिक्षा अभियाना' च्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(a) त्याचा प्रारंभ 2001 मध्ये झाला.

(b) त्याचा प्रारंभ हा प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण साध्य करण्यासाठी झालेला आहे.

(c) 'पढ़े भारत बढ़े भारत' हा सर्व शिक्षा अभियानाचा उप-कार्यक्रम आहे.

(d) 'शिक्षण' (Shikshan) या नावाचे सरकारी द्वार (portal) हे सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या निरीक्षणासाठी सुरु केले आहे.

वरीलपैकी कोणती विधाने **योग्य** आहेत ?

(1) (a), (b) आणि (c) (2) (b), (c) आणि (d)

(3) (c) आणि (d) फक्त (4) वरील सर्व

Consider the following statements regarding 'Sarva Shiksha Abhiyan' (SSA) :

(a) It was started in 2001.

(b) It was started to achieve the Universalisation of Elementary Education.

(c) 'Padhe Bharat Badhe Bharat' is a sub-programme of SSA.

(d) Government portal under the name 'Shikshan' has been launched to monitor the SSA programme.

Which of the statement given above are **correct** ?

(1) (a), (b) and (c) (2) (b), (c) and (d)

(3) (c) and (d) only (4) All above

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

39. भारतीय वृत्तपत्र परिषदे (Press Council of India) संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(a) परिषद वृत्तपत्रे, वृत्त एजन्सीज, संपादक आणि वार्ताहर यांना मार्गदर्शक तत्त्वांचा भंग केल्यास दंडीत करु शकते.

(b) परिषदेचे निर्णय हे अंतीम असतात आणि त्याविरुद्ध न्यायालयात अपील करता येत नाही.

(c) परिषदेला इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या कार्याचे परिक्षण करण्याचा देखील अधिकार आहे.

वरीलपैकी कोणते विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) आणि (b) (2) केवळ (b)

(3) (b) आणि (c) (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Consider the following statements about Press Council of India :

(a) It can penalize newspapers, news agencies, editors and journalists for violation of the guidelines.

(b) It's decisions are final and cannot be appealed before a court of law.

(c) It has a power to review the functioning of the electronic media also.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) (a) and (b) (2) Only (b)

(3) (b) and (c) (4) None of the above

---

40. अनुसूचित जातीच्या मुलांमध्ये शैक्षणिक मागासलेपणाची कारणे _____ आहेत.

(a) दारिद्र्य

(b) शारीरिक व सामाजिक विलगता

(c) शाळेमध्ये सहज प्रवेशाचा अभाव

(d) इच्छाशक्तीचा अभाव

(e) निम्न मानसिकता

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त (a), (b), (c) (2) फक्त (b), (d), (e)

(3) फक्त (b), (c), (d) (4) वरील सर्व

The reasons for educational backwardness of scheduled caste childrens are _____.

(a) Poverty

(b) Physical and Social Segregation

(c) Lack of easy access to school

(d) Lack of will power

(e) Low mentality

Answer Options :

(1) Only (a), (b), (c) (2) Only (b), (d), (e)

(3) Only (b), (c), (d) (4) All of the above

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

41. खालील कथने लक्षात घ्या :

(a) VVPAT चा अर्थ वोटर वेरिफायबल पेपर ऑडिट ट्रेल असा आहे.

(b) VVPAT स्लीप मध्ये उमेदवाराचा अनुक्रमांक, नांव व चिन्ह याचा समावेश असतो.

(c) VVPAT स्लीप ही पारदर्शक खिडकीमधुन 5 सेकंदापर्यंत बघता येवू शकते.

वरीलपैकी **योग्य** कथने कोणती आहेत ?

(1) फक्त (a), (b) (2) फक्त (b), (c) (3) फक्त (a), (c) (4) वरीलपैकी सर्व

Consider the following statements :

(a) VVPAT stands for Voter Verifiable Paper Audit Trail.

(b) VVPAT slip contains serial number, name and symbol of the candidate.

(c) VVPAT slip remain exposed through a transparent window for about 5 seconds.

Which are the **correct** statements from above ?

(1) Only (a), (b) (2) Only (b), (c) (3) Only (a), (c) (4) All of the above

---

42. खालील कथने लक्षात घ्या :

(a) पारूर विधानसभा मतदारसंघामध्ये सर्वप्रथम इलेक्ट्रानिक मतदान यंत्राचा वापर करण्यात आला.

(b) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा सर्वप्रथम वापर मे, 1982 मध्ये करण्यात आला.

(c) निवडणुकीमध्ये EVM चा वापर करण्याचा भारताचा निवडणूक आयोगाला अधिकार देण्याबाबतचे नवीन कलम 61 A हे डिसेंबर, 1989 मध्ये लोकप्रतिनिधीत्व कायदा, 1951 मध्ये जोडण्यात आले.

वरीलपैकी कोणती कथने **योग्य** आहेत ?

(1) फक्त (a) व (b) (2) फक्त (b) व (c)

(3) फक्त (a) (4) वरीलपैकी सर्व

Consider the following statements :

(a) The Electronic Voting Machines (EVM) were used for the first time in Parur Assembly Constituency.

(b) The Electronic Voting Machines (EVM) were used for the first time in May, 1982.

(c) In December, 1989 a new section 61 A was inserted in the Representation of the People Act, 1951 empowering the Election Commission of India to use EVM in elections.

Which are the **correct** statements from the above ?

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c)

(3) Only (a) (4) All of the above

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

43. राजकीय पक्षांसंबंधी खालील विधाने विचारात घ्या :

(a) सध्या भारतात सात राष्ट्रीय पक्ष आहेत.

(b) राजकीय पक्षाची राष्ट्रीय अथवा राज्य पक्ष म्हणून मिळालेली मान्यता केवळ सलग दोन विधानसभा अथवा दोन लोकसभा निवडणुकीत अट पूर्ण करण्यास अपयशी झाला तरच तो पक्ष आपला असलेला दर्जा गमावतो.

(c) याचाच अर्थ असा की, पक्ष आपला दर्जा पुढील येत्या निवडणुकीतील कामगिरी शिवाय कायम राखतात.

पर्यायी उत्तरे :

(1) विधाने (a) आणि (b) बरोबर, (c) चुकीचे.

(2) विधाने (b) आणि (c) बरोबर, (a) चुकीचे.

(3) विधाने (a) आणि (c) बरोबर, (b) चुकीचे.

(4) सर्व विधाने बरोबर.

Consider the following statements regarding political parties in India :

(a) At present, there are seven National parties in India.

(b) Once recognised as a National or a State party, a political party loses its given status only if it fails to fulfil any of the conditions for two successive Assembly or two successive Lok Sabha elections.

(c) That means a party retains that status irrespective of its performance in the next elections.

Answer Options :

(1) Statements (a) and (b) are correct and (c) is false.

(2) Statements (b) and (c) are correct and (a) is false.

(3) Statements (a) and (c) are correct and (b) is false.

(4) All statements are correct.

---

44. सध्या, भारतीय राजकीय पक्षांची प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रमाणे :

(a) बहुपक्ष पद्धती (b) प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व

(c) प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव (d) व्यक्ति माहात्म्य

योग्य पर्याय :

(1) (a), (b) आणि (c) (2) (a), (c) आणि (d)

(3) (b), (c) आणि (d) (4) वरील सर्व

At present, main features of the Indian Political Party system are :

(a) Multi party system (b) Dominance of regional parties

(c) Lack of effective opposition (d) Personality cult

Correct Options :

(1) (a), (b) and (c) (2) (a), (c) and (d)

(3) (b), (c) and (d) (4) All above

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

45. कोठारी आयोगाने अनुसूचित जमातीच्या शिक्षणाबाबत कोणत्या शिफारशी केल्या आहेत ?

(a) करिअर किंवा नोकरीभिमुख अभ्यासक्रमांवर भर दिला पाहिजे.

(b) शिक्षणातील लिंग विषमता दूर करण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे.

